चिंतन

# राज्यात दरवळणार चंदनाचा सुगंध



डॉ. बी.बी. पवार
(संस्थापक संपादकः 'पूर्वा कृषिदूत')

- वन विभागाच्या 'पिंजऱ्या'तून चंदनवृक्ष झाले मोकळे
- नगदी पिकांच्या नुकसानीची चंदन लागवडीतून होईल भरपाई
- शास्त्रोक्त लागवड करणारे शेतकरी ठरतील नफ्याचे धनी
- चंदनजन्य सुगंधी उत्पादनांमुळे राज्याचा महसूल वाढेल
- चंदन लागवडीच्या क्षेत्रात आंतरपिके घेणे मात्र आवश्यक
- विविधता पारखून दर्जेदार बियाणे शेतकऱ्यांना पुरवले पाहिजेत

चंदन हा अतिशय मौल्यवान वृक्ष आहे. चंदनाची अगरबत्ती सर्वांनाच आवडते. तिचा प्रसन्न सुवास खूपच आल्हाददायक असतो. चंदनाच्या लाकडाचा उपयोग कोरीव काम, काष्ठशिल्प, सुगंधी तेल, पावडर, पूजाअर्चा यांसाठी होतो. तसेच औषधी म्हणून जगभरातून भारतीय चंदनाला मोठी मागणी आहे. राज्यात वारकरी संप्रदायाची संख्या प्रचंड आहे. त्यामुळेच चंदनाच्या उटीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. चंदन म्हटले की चोरी आणि तस्करी अशा बातम्या वारंवार कानावर पडत असतात; चंदनाची मोठमोठी झाडं रात्रीतून तोडून लांबवली जातात!

काही वर्षांपासून हवामानात झालेल्या बदलांमुळे खरीप हंगामातील पिके कायमच अडचणीत येतात. विशेषतः सोयाबीन व कापूस ही नगदी पिके अवेळी अथवा जास्त पडणाऱ्या पावसामुळे मोठ्या प्रमाणात वाया जातात. या पिकांखाली राज्यात मोठे क्षेत्र आहे. या पिकांप्रमाणेच भाजीपाला व इतर पिकांचेही नुकसान होत असते. चंदन लागवडीमुळे हे नैसर्गिक नुकसान काही प्रमाणात कमी करता येईल.

## चंदन लागवड आणि उद्योगाला मिळणार चालना

दि. २० ऑक्टोबर २०२१ रोजी मंत्रालयात वन राज्यमंत्री श्री. दत्तात्रय भरणे यांच्या दालनात त्यांच्याच अध्यक्षतेखाली बैठक झाली. या बैठकीला अप्पर प्रधान वनसंरक्षक व मुख्य महाव्यवस्थापक (नियोजन) श्री. संजीव गौंड आणि प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन) उपस्थित होते. त्याचप्रमाणे वनविभागाचे इतर काही अधिकारी व काही चंदन उद्योजक (अगरबत्ती, चंदन पावडर, तेल, काड्या इत्यादींचे उत्पादक) हजर होते. त्यावेळी चंद्रपूरचे वनसंरक्षक श्री. किशोर मानकर यांनी

अगरबत्ती व्यवसायाच्या सद्य:स्थितीची माहिती दिली. चंदन उद्योजक श्री. वदीराज मदभावी यांनी उद्योजकांच्या मागण्या सविस्तरपणे मांडल्या. यावेळी ना.श्री. भरणे म्हणाले, ''राज्यात चंदनाची लागवड वाढवून हा उद्योग वाढल्यास राज्याच्या महसुलात भर पडेल. चंदन उद्योगासाठी धोरणात्मक निर्णय घेऊन उद्योजकांना सहकार्य करण्यात येईल. त्यासाठी लागणाऱ्या विविध परवानग्या विहित वेळेत देण्याबद्दल सर्व संबंधित यंत्रणांना सूचना देण्यात येतील. चंदनाच्या विविध उत्पादनांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठ्या प्रमाणावर मागणी आहे. त्यामुळे चंदन लागवडीस प्रोत्साहन देण्यासाठी शासन सर्वतोपरी मदत करेल. चंदन व्यवसायाला, विशेषत: अगरबत्ती व्यवसायाला कशा प्रकारे मदत करता येईल याची वन विभागाने पाहणी करावी.'' शासनाच्या या निर्णयामुळे चंदन लागवड राज्यात निश्‍चितच वाढीस लागेल याबद्दल शंका नाही.

## अशी आहे चंदन वृक्षांची सद्य:स्थिती

राज्यात अनेक ठिकाणी शेतातील बांधांवर, घरांच्या परसबागेत, नदी-नाल्यांच्या काठांवर आणि जंगलात नैसर्गिकरित्या चंदनाची झाडं उगवलेली दिसतात. त्यांचा प्रसार पक्ष्यांच्या माध्यमातून होत असावा. काही शेतकरी मात्र चार-पाच दशकांपासून पारंपरिक पद्धतीने चंदनाची शेती करीत आहेत. चंदनाची पूर्ण वाढ होण्यासाठी जवळपास १५ वर्षांचा कालावधी लागतो. या झाडाची वाढ अतिशय संथगतीने होत असते. आजूबाजूला जास्त न पसरता या झाडाची वाढ सरळ वरच्या दिशेने होत असते. चंदनाच्या लाकडापासून सुवास येण्यासाठी झाड परिपक्व होणं आवश्यक असतं. अशा मोठ्या झाडांवर चोरांची नजर असते. योग्य वेळ व संधी साधून चोर अशा मोठ्या झाडांची रातोरात तोड करून लाकडं पळवून नेत असतात. चंदनाच्या सुवासामुळे झाडाच्या बुंध्याजवळ सापाची वस्ती असते अशी अंधश्रद्धा आहे. तीन वर्षांपूर्वी केंद्र सरकारने चंदन लागवडीस परवानगी दिली. तसेच राज्य शासनाने चंदन वृक्षाला सहा महिन्यांपूर्वीच वन विभागाच्या जोखडातून मुक्त केले आहे. त्यामुळे बांधावर, शेतात किंवा परसबागेत लावलेल्या किंवा आपोआप उगवलेल्या झाडांची तोड करण्यासाठी शेतकऱ्यांना आता वन विभागाच्या परवानगीची गरज लागणार नाही.

## महाराष्ट्रात चंदनाची लागवड वाढणार

राज्य सरकारने प्रोत्साहन दिल्यामुळे आता राज्यभर चंदनाची लागवड वाढणार आहे. हा वृक्ष सदाहरित आहे. याची वाढ कोरडवाहू आणि पाण्याचा चांगला निचरा होणाऱ्या जमिनीत चांगली होते. राज्यात अशा प्रकारची जमीन कमी- अधिक प्रमाणात सर्वच भागात आहे. भारी प्रकारच्या जमिनीतही उंच वरंबा करून त्यावर लागवड करता येईल. सध्या द्राक्ष व डाळिंब या पिकांची लागवड या पद्धतीने केली जाते. अहमदनगर जिल्ह्यातील प्रवरा नदीच्या खोऱ्यातील अतिशय सुपीक व भारी जमिनीत डाळिंबाचे उत्कृष्ट उत्पादन घेतले जात आहे. हलक्या व मध्यम प्रकारच्या जमिनी जेथे जास्त प्रमाणात नाहीत अशा अहमदनगर, सोलापूर आणि जळगाव जिल्ह्यांसह मराठवाडा व विदर्भात या तंत्राचा वापर करून लागवड वाढवता येईल.

## उत्कृष्ट जातींची निवड करणे आवश्यक

चंदन हे शेतात येणारे नवीन पीक असणार आहे. त्याची लागवड करताना दोन ओळींतील व दोन झाडांतील अंतर निश्‍चित करावे लागेल. जे शेतकरी अनेक वर्षांपासून चंदनाची लागवड करीत आहेत, त्यांचा अनुभव लक्षात घेऊन लागवडीचे अंतर ठरवता येईल. देशभरात जेथे जेथे चंदनाची झाडं असतील तेथे त्यांच्यातील विविधता तपासावी लागेल. वन विभागाने हे महत्त्वाचे काम करावे. कृषी विभागाने व कृषी विद्यापीठांनीही त्याला सहकार्य करावे. उत्कृष्ट झाडं निश्‍चित केल्यावर त्यांचे बियाणे जमा करून ते शेतकऱ्यांना पुरवले पाहिजे. जोपर्यंत अशी झाडं निश्‍चित होत नाहीत, तोपर्यंत जे बियाणे उपलब्ध असेल

ते शेतकऱ्यांनी वापरावे. चंदन हे परपरागीभवन होणारे झाड आहे. सातेरी मधमाशी व काळ्या किंवा लाल मुंग्या परागीभवनाचे कार्य करतात. परिसरात एकापेक्षा अधिक झाडं असतील तर त्या झाडांवर परपरागीभवन होऊन बी तयार होईल. असे तयार होणारे बियाणे हे संकरित बियाणे असते. संकरित बियाण्यापासून तयार होणारी झाडं जोमदार असतात. त्यामुळे निवड केलेल्या उत्कृष्ट झाडापासून मिळणाऱ्या बियांपासून चांगली झाडं मिळतीलच. तशीच उत्कृष्ट झाडं इतर झाडांच्या बियाण्यापासूनही मिळण्याची शक्यता राहील. निवडलेल्या झाडांमध्ये त्याच झाडावरील परागकणांमुळे बियाणे तयार होईल किंवा दोन किलोमीटर परिसरात असलेल्या झाडांच्या परागकणांमुळे बियाणे तयार होईल. अशा झाडापासून मिळालेले बियाणे नक्कीच उत्कृष्ट पिढीला जन्म देईल.

## आंतरपिके घ्यावी लागतील

चंदन हे बहुवर्षीय पीक राहील. लागवड केल्यापासून जवळपास १५ वर्षे ते उभे राहील. त्यावेळी शेतकऱ्याला चांगला आर्थिक लाभ होईल. १५ वर्षांचा कालावधी फार मोठा आहे. चंदन लागवड केलेल्या क्षेत्रापासून दरवर्षी उत्पादन मिळविण्यासाठी त्या क्षेत्रात आंतरपिके घेणे गरजेचे ठरेल. सुरुवातीला ३-४ वर्षे वृक्षांची वाढ साधारण २-३ मीटर होईपर्यंत जास्त उंच न वाढणारी पिके खरीप व रब्बी हंगामात घेता येतील. त्यात भुईमूग, उडीद, मूग, चवळी, हरभरा, करडई, सोयाबीन, जवस, मोहरी, घेवडा, कांदा, लसूण, मेथी, बियाण्यासाठी कांदा, टोमॅटो, वांगी, मिरची, गवार, कोबी, फूलकोबी अशा पिकांचा समावेश असेल. त्यानंतर चंदन वृक्षांची वाढ झाल्यावर पपई, सूर्यफूल, बाजरी, ज्वारी, मका, गहू, वाल, भात अशा उंच वाढणाऱ्या पिकांचा समावेश करता येईल. अशी आंतरपिके घेतल्यामुळे शेतकऱ्यांना उत्पन्नाचा कायमस्वरुपी स्त्रोत सुरू राहील.

## सुवासिक उत्पादनांची बाजारपेठ वाढेल

चंदनाचा उपयोग अगरबत्ती, तेल, चंदन पावडर, काड्या, चंदन उटीसाठी लाकूड, काष्ठशिल्प इ. उद्योगांमध्ये केला जातो. अगरबत्त्यांपैकी चंदन अगरबत्तीचा वास मनाला अतिशय प्रसन्न करणारा असतो. त्याचा कुणालाही त्रास होत नाही. सध्या बाजारात उपलब्ध असणाऱ्या अगरबत्त्यांपैकी काही ठराविक अगरबत्त्याच चांगला सुवास देतात. त्यापैकी अनेक अगरबत्त्यांचा वास अतिशय उग्र असतो. त्यांच्या धुराचा अनेक लोकांना त्रास होत असतो. चंदन अगरबत्तीला मोठी मागणी आहे; पण ती फारच दुर्मिळ आहे. कर्नाटकातून बरेच प्रकार आपल्याकडे येतात. त्यातील चंदन अगरबत्ती नावाने विकल्या जाणाऱ्या अनेक अगरबत्त्या फसव्या असतात. चंदन अगरबत्तीच्या नावाखाली अनेक वेळा फसवणूक होत असते. राज्यात मोठ्या प्रमाणावर चंदन लागवड झाल्यावर शुद्ध चंदन अगरबत्तीचा विपुल प्रमाणात पुरवठा होईल. दुसऱ्या राज्यातून चंदन अगरबत्त्या आणून विकण्याची वेळ येणार नाही. तेल व चंदन पावडरचं उत्पादनही मोठ्या प्रमाणावर वाढेल. त्यांची निर्यात करून शेतकऱ्यांच्या व उद्योजकांच्या उत्पन्नात भरीव वाढ होईल. तेलाचा उपयोग महिलांच्या व पुरुषांच्या स्प्रेमध्ये करता येईल. त्यामुळे उग्र वासाचे सेंट कुणी वापरणार नाही.

## शासनाने आर्थिक मदत करावी

चंदन हे दीर्घकालीन पीक आहे. त्यापासून पैसा मिळण्यास जवळपास १५ वर्षे लागतील. बियाणे किंवा रोपे खरेदीसाठी शासनाने शेतकऱ्यांना आर्थिक मदत करावी. लाकडांच्या विक्रीसाठी उद्योजकांतर्फे मदत करावी. बँकांनी शेतकऱ्यांना दीर्घ मुदतीचे कर्ज द्यावे. सरकारने त्यासाठी हमी द्यावी. चंदनाची चोरी व तस्करी यापासून शासनाने शेतकऱ्यांना संरक्षण द्यावे. लाकडाची चोरी करणारे सापडले तर त्यांना सश्रम जन्मठेपेची शिक्षा व्हावी. त्यामुळे चोर चंदनाच्या वृक्षांकडे वाकड्या नजरेने पाहणार नाहीत. शेतकऱ्यांना बियाण्याचा सुलभ पुरवठा केल्यास राज्यात मोठ्या क्षेत्रावर चंदनाची लागवड होऊ शकेल आणि सर्वत्र चंदनाचा सुगंध दरवळेल असे वाटते. ■